**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाअंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पूर्ण केलेल्या योजना स्थानिक स्वराज्य संस्थांनी हस्तांतरीत करून न घेतल्याने त्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने थेट चालविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय , क्रमांक : ग्रापापु-१००५/प्र.क्र.-१३६/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक १० ऑगस्ट, २००५**

**प्रस्तावना :-**

शासनाने, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता क्षेत्रात, नवे मागणी आधारित व समूह सहभागाचे धोरण राज्यात अवलंबिण्यापूर्वी, जिल्हा परिषद व ग्राम पंचायतीच्यावतीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पाणी पुरवठा योजनेचे बांधकाम करून त्यानंतर चालविण्यासाठी व त्यांची देखभाल दुरूस्ती करण्यासाठी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थाकडे हस्तांतरीत करीत असे. परंतु, पुष्कळदा योजनेचे बांधकाम बरोबर नाही व इतर अन्य कारणावरुन या योजना ताब्यात घेण्यास संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी नकार दर्शविलेला आहे अथवा टाळाटाळ केली आहे असे निदर्शनास येते. वस्तुतः महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ च्या कलम १०० अन्वये व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम-४५(१) अन्वये एजन्सी तत्वावर स्थानिक स्वराज्य संस्थासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पूर्ण केलेल्या पाणी पुरवठा योजना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी ताब्यात घेणे अनिवार्य आहे. परंतु, प्रत्यक्षात अशा योजना ताब्यात घेतल्या न गेल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास या योजनांवर देखभाल व दुरुस्तीसाठी खर्च करावा लागतो. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही रक्कम संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून आपल्या हिशोबात "येणे" दाखविते. परंतु, सदर स्थानिक स्वराज्य संस्था ती रक्कम बहुतांश वेळी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला अदा करीत नाही. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही रक्कम पाणी पट्टीच्या रुपाने लाभधारकांकडून थेट वसूलही करू शकत नसल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा खर्च मात्र होतो, या स्थानिक स्वराज्य संस्था अशा योजना हस्तांतरीत न झाल्या तरी पाणी पुरवठा योजनेच्या कार्यक्षेत्रातील ग्राहक / लाभधारकांकडून काही प्रमाणात पाणी पट्टी वसूल करतात व ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला न देता त्या रकमा जिल्हा देखभाल व दुरुस्ती निधीमध्ये वळवून त्याचा अन्यत्र वापर करतात.

२. आता नव्या मागणी आधारित समूह सहभागाच्या धोरणाच्या अंतर्गत अशी परिस्थिती उद्‌भवणार नाही. कारण योजनेचे बांधकाम आता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला शासनाकडून आपोआप मिळणार नसून ते महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेकडून थेट स्वबळावर प्रयत्न करून मिळवायचे असल्याने बांधकाम करार हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये होणार आहे. त्यामुळे एकीकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला हे काम स्वतःच्या बळावर मिळण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. तर, संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांनाही इतर बाहेरील संस्थांकडून काम करून घेण्याची मुभा देण्यात आलेली आहे. संबंधीत स्थानिक संस्थांनी हे काम संबंधीत स्थानिक संस्थेस दिले तरी त्यातील परस्पर व्यवहार स्वतंत्र कराराने निश्चित होणार असल्याने योग्य त्या न्यायालयात जाण्याचा पर्याय उभय पक्षांना उपलब्ध आहे. तसेच, कालांतराने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातून स्वतंत्र देखभाल व दुरूस्ती कंपनी गठीत करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याने याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला निश्चितच आजच्या पेक्षा

जास्त प्रमाणात देखभाल व दुरूस्तीचे काम स्वतःचे तांत्रिक ज्ञानांचे बळावर व क्षमतेवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थां अशा तऱ्हेने स्वतःसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून बांधून घेतलेल्या योजना ताब्यात घेण्यास टाळाटाळ करू शकणार नाही.

३. परंतु, आज जुन्या धोरणाखाली ज्या योजना स्थानिक स्वराज्य संस्थांनी ताब्यात घेतलेल्या नाहीत व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे राहिल्याने त्या स्वतःचा निधी खर्च करून त्यांना चालवाव्या लागतात त्याबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. या सर्व योजना पुरवठा अधारित, शासन प्रणित धोरणा अंतर्गत निर्माण झालेल्या असून त्यामधून ग्राहकांना पाणी उपलब्ध होत आहे. ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. मात्र, त्यांच्या देखभाल दुरूस्तीसाठी पैसा उपलब्ध होत नाही. जरी वसूली झाल्यास संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेकडे ती राहते. या परिस्थितीत ग्राहकही पाणी पट्टी भरत नाही, मात्र पिण्याच्या पाण्याचा वापर करतात असे दिसून आले आहे. यामुळे या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने लावलेला कर्मचारी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरीत होत नाही व त्यांच्या पगाराचा भूर्दंडही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर पडतो. या प्रश्नांवर मार्ग काढण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

प्रस्तावनेत नमूद बाबींचा विचार करून शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ अन्वये शासन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला असे निर्देश देत आहे की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पूर्ण केलेल्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी ताब्यात घेतल्या नाहीत तर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या योजना संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्या रितसर ताब्यात घेईपर्यंत त्यांची दैनंदिन व विशेष देखभाल व दुरूस्ती, ग्राहकांना दररोज पाणी मिळण्याच्या जबाबदारीसह पाणी जोडण्या मंजूर करणे, त्या देणे, त्यासाठी आवश्यक दर लावणे, ग्राहकांना बिले देणे, त्यांची वसुली करणे व थकीत वसुलीसाठी आवश्यक उपाययोजना व सक्तीच्या वसूलीचे अधिकार, यासह या पाणी पुरवठा योजनाच्या क्षेत्रातील पाणीपट्टीचे दर ठरविणे, ती पाणीपट्टी वसूल करणे, थकीत वसूलीसाठी ग्राहकांवर कार्यवाही करणे, नवीन नळ जोडण्या मंजूर केलेल्या ग्राहकांना पाणी पट्टी बील लावणे, ती बीले वितरीत करणे, त्यांच्याकडून रक्कम वसूल करणे, रक्कम वसूल न झाल्यास त्यावर कायदेशीर कार्यवाही करणे या अनुषंगाने संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेने ताब्यात न घेतलेल्या योजनेपुरते अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला, अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने नेमलेले त्यांचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने या कामासाठी नेमलेल्या इतर एजन्सीला देण्यात येत आहेत.

२) मात्र, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने हे सर्व अधिकार व जबाबदारी पार पाडतांना या योजनेपासून मिळालेले पाणी पट्टीचे उत्पन्न, नळ जोडण्यापासून मिळणारे उत्पन्न व इतर अनुषंगिक उत्पन्न आणि **या योजनेवर करण्यात आलेला देखभाल दुरूस्तीचा खर्च याचे हिशोब स्वतंत्रपणे ठेवावे.**

३) या देखभाल दुरुस्तीच्यासाठी सध्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेला कर्मचारी वर्ग वपरावा व **किमान कर्मचारी वापरुन योजनांची देखभाल दुरूस्ती कशी होईल या दृष्टीने कटाक्ष ठेवावा. या सर्व कर्मचाऱ्यांचा पगारही वसूल केलेल्या पाणीपट्टीतून भागवावा.** यासाठी आवश्यक असल्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे असलेल्या कर्मचारी वर्गास आवश्यक प्रशिक्षण देण्याची व्यवस्था महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करावी.

४) पूर्ण झालेल्या परंतु, ताब्यात न घेतलेल्या योजनांबरोबरच **महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे ज्या योजना प्रगतीपथाकडे आहेत (जुन्या पुरवठा आधारित धोरणा अंतर्गत)** त्या योजना तीन महिन्याच्या चाचणी कालावधीनंतर संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी ताब्यात घेतल्या नाहीत तर, वर नमूद केल्याप्रमाणे या प्रकारच्या योजनाबाबतही सर्व अधिकार व जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पार पाडावी.

५) **मात्र नवीन मागणी आधारित धोरणाअंतर्गत संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांकडे थेट निधी जाऊन स्थानिक स्वराज्य संस्थांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला दिलेल्या कामाच्या बाबतीत उपरोक्त नमूद केलेले धोरण लागू नसल्याने अशा योजना या शासन आदेशाच्या अंतर्गत येणार नाहीत.** त्याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने संबंधीत संस्थांशी केलेल्या कामाच्या स्वतंत्र करारानुसार याबाबत आवश्यक निर्णय व पुढील कार्यवाही उभय पक्षांनी त्यांच्या स्तरावर करावी. यामध्ये कोणताही तंटा निर्माण झाल्यास उभय पक्ष आपल्या स्वतंत्र जबाबदारीवर योग्य त्या कायदेशीर मार्गाचा अवलंब करून आपला तंटा सोडवून घेतील. याबाबत शासनाकडून कोणताही हस्तक्षेप सर्वसाधारण परिस्थितीत केला जाणार नाही.

६) उपरोक्त योजनेमध्ये शक्यतो महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने कोठल्याही प्रकारचे नळ कोंडाळे / सार्वजनिक नळ देवू नये. गावात घरगुती नळ जोडण्यांद्वारे अथवा **सामुदायिक (ग्रुप) नळ** जोडण्यांद्वारे पाणी वितरण करण्यात यावे. या योजनेची सर्व मालमत्ता संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांनी रितसर ताब्यात घेईपर्यंत व याबाबत या आदेशाद्वारे सर्व जुनी देणी उपलब्धकरून देईपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांच्या ताब्यांत आहे असे समजण्यात येईल व या मालमत्तेच्या सुयोग्य उपयोगासाठी जी जी कार्यवाही करणे आवश्यक आहे ती सर्व कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला प्राप्त होतील.

७) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या योजना स्वत: न चालवता कंत्राटदारांकडून चालविण्यास सक्षम असेल व याबाबत या आदेशाद्वारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देण्यात आलेले अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण करारान्वये अशा कंत्राटदारालाही देऊ शकेल.

८) प्रादेशिक पाणी पुरवठा योजने अंतर्गत लाभार्थी गावातील पंचायती क्षेत्रात असलेली कनेक्शन अवैध नळ जोडण्या बाळगणारे व इतर सर्व प्रकारचे अधिकृत ग्राहक या आदेशाद्वारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे ग्राहक होतील व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने योजना रीतसर ताब्यात घेईपर्यंत ती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास हस्तांतरीत समजण्यास येईल.

९) योजनांची दैनंदिन देखभाल दुरूस्ती, संचलन, परीरक्षण, पाणीपट्टी वसूली करण्यासाठी येणारा **"खर्च"** तसेच घसारा इत्यादी खर्च म्हणून धरण्यात येईल. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे इतर Overheads इ.समावेश करून योजना निहाय पाणीपट्टीचे दर ठरविण्यात यावेत. यांमुळे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १२४ (आठ) व (बारा) नुसार ग्रामपंचायतीस असलेले पाणीपट्टी लावण्याचे अधिकार या योजनांमधील लाभार्थी गावांपुरते स्थगित ठेवण्यात येत असून ते अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ अन्वये त्यांना देण्यात येत आहेत.

१०) प्रादेशिक पाणी पुरवठा योजना चालविणेसाठी, देखभाल दुरुस्तीसाठी येणारा वार्षिक खर्च भरून काढण्यासाठी लागणारे आवश्यक दर पहिल्याच वर्षी जुन्या दरामध्ये सुधारणा करून लावणे शक्य होत नसल्यास सुरूवातीस सर्व लाभार्थी गावांपैकी जास्तीत जास्त दर असलेल्या गावाचे पाणी दर किंवा शासनाने विहित केलेले न्युनतम दर यापैकी जे जास्त असेल ते लागू करून योजनेच्या कामकाजास सुरुवात करण्यात यावी. हे दर ५ वर्षांमध्ये योजना स्वयं-संतुलीत होईल अशाप्रकारे वाढविण्यात यावे.

११) वरील प्रक्रीयेअंती सर्व ग्राहकांना नियमित शुध्द व निर्जंतुक पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची राहील यासाठी आवश्यक तक्रार निवारण व्यवस्था व नागरिकांची सनद संबंधीत प्रादेशिक पाणी पुरवठा योजना राबविणाऱ्या विभागाने चालू करावी व ती अंमलात आणावी काही कारणास्तव जसे पाण्याची अनुपलब्धता विजेची अनुलब्धता देखभाल व दुरूस्तीसाठी आवश्यक वेळ व नैसर्गिक प्रकोप वगळता इतर वेळी नियमित पाणी पुरवठा करण्यात यावा. अशी परिस्थिती उद्‌भवण्यापूर्वी / उद्‌भवल्यास नागरिकांना त्यांची माहिती त्वरित देण्यात यावी व शक्यतो पर्यायी व्यवस्था करण्यात यावी.

१२) प्रत्येक पाणी पुरवठा योजनेत अतिरिक्त क्षमता उपलब्ध असल्यास त्या क्षमतेचा वापर करून विविक्षीत कालावधीसाठी व्यावसायीक व औद्योगिक ग्राहकास पाणी पुरवठा करण्याचे व त्यातून

व्यापारी तत्वावर पाणीपट्टी वसुली करण्याचे अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला देण्यात येत आहेत. यासाठी आवश्यक करारनामा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व संबंधीत ग्राहक यांचेत राहील.

१३) पाणी पट्टी देयक देणे, पाणी पट्टी वसूल करणे, विलंब शुल्क आकारणे व ग्राहकांनी पाणी पट्टी न भरल्यास ग्राहकांची नळ जोडणी खंडीत करणे व थकबाकी अदा केल्यावर पुनर्जोडणी करणे इ. सर्व बाबींचे अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे राहतील.

१४) ग्राहकांकडून पाणी पट्टी वसुल न झाल्यास ग्राहकांचे कनेक्शन तोडल्यानंतर थकबाकी वसुलीसाठी योग्य कायदेशीररित्या नोटीस देऊन ग्राहकांच्या संपत्तीची जप्ती व लिलावाबाबतची कार्यवाही करणेचे अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास राहतील.

१५) वरील प्रत्येक प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची तांत्रिक पाणी विद्युत अंकेक्षण दर तीन वर्षांनी एकदा भरण्यात यावे. वित्तीय अंकेक्षण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या लेखा परिक्षणाकडून करून घेऊन त्याचा अहवाल सल्लागार समिती व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळापुढे ठेवण्यात यावा. सल्लागार समिती व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे स्थानिक योजना चालविण्याशी संबंधीत अधिकारी व ग्राहकांचे निवडलेले प्रतिनिधी यांची असावी.

१६) योजनेचे देखभाल व दुरूस्तीचे सर्व हिशोब ज्यांनी नियमीत पाणीपट्टी भरली आहे त्या ग्राहकांना पाहण्यासाठी खुले असतील व त्याच्या प्रती आवश्यक रकमा भरून त्यांना प्राप्त होवू शकतील.

१७) हे पुन्हा एकदा स्पष्ट करण्यात येते की, सदर शासन आदेश जुन्या पुरवठा आधारित धोरणाअंतर्गत झालेल्या / पूर्ण होणाऱ्या संबंधीत व स्थानिक स्वराज्य संस्थांनी (जिल्हा परिषद प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेकरीता व ग्रामपंचायत स्वतंत्र योजनेकरीता) ताब्यात न घेतले त्या योजनांकरीता लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(वि. शं. धुमाळ)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**
मा. राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभग, जिल्हा परिषद

सर्व तहसीलदार
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
महालेखापाल, महाराष्ट्र - १ मुंबई (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र - २ नागपूर (लेखा परिक्षा) व (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
नियोजन विभाग/वित्त विभाग/ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७